बृहन्मुंबई महानगरपालिका
सार्वजनिक आरोग्य खाते
कस्तुरबा रुग्णालय

एचओ/11935 /केएच दिनांक 03.04.2021

## सूचना

कस्तुरबा रुग्णालयाच्या आस्थापनेवरील संवर्गातील क्ष-किरण सहाय्यक संवर्गाचे 1 पद कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी दिनांक 08.04.2021रोजी सायंकाळी 4=00 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्हता –**

1)उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष किरण विषयातील बी.पी.एम.टी (Bachlor in Paramedical Technology in Rediography) 3 वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा. व त्याने 6 महिन्याचे इंटर्नशिप पूर्ण केलेली असावी.

किंवा

उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.Sc in Physics) पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा. व रुग्णालयातील क्ष-किरण विभागातील कामकाजाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.

किंवा

उमेदवार हा 12 वी नंतर रेडियोग्राफी विषयातील पदविका परीक्षा (12$^{th}$ +Diploma इन Radiography) परीक्षा उत्तीर्ण असावा व क्ष-किरण विभागातील कामकाजाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.

3) उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे 'सीसीसी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर ' किंवा 'सी स्तर ' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा. किंवा इतर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

4) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.

**कंत्राटी पद्धतीवरील नियुक्ती खालील अटी व शर्तीनुसार राहील**

1) कंत्राटी तत्वावर नियुक्त होणाऱ्या क्ष-किरण सहाय्यक यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.
2) कंत्राटी तत्वावरील क्ष-किरण सहाय्यक यांची वयाची अट 33 वर्षे राहील.
3) कराराच्या कालावधीत कंत्राटी तत्वावरील क्ष-किरण सहाय्यक यांना हमीपत्र सादर करावे लागेल.
4) कंत्राटी तत्वावरील क्ष-किरण सहाय्यक यांना दरमहा रु. 14000/- इतके मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.
5) कराराच्या कालावधीत वार्षिक 15 दिवसांपेक्षा जास्त (सहा महीने -7 दिवस ) किरकोळ रजा देय राहणार नाही .
6) मनपा प्रशासन एक महिन्याची पूर्वसूचना देऊन त्यांची सेवा संपुष्टात आणेल.
7) नेमणूकीच्या विहित कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या क्ष-किरण सहाय्यक यांची राहील व तसे हमीपत्र त्यांचेकडून घेण्यात येईल.
8) कराराच्या कालावधीत संबंधित क्ष-किरण सहाय्यक यांना कोणतेही प्रशासकीय अथवा आर्थिक संबंधात अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

9) कराराच्या कालावधीत सदर क्ष-किरण सहाय्यक यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीतील नियम लागू राहणार नाहीत. ही नेमणूक केवळ कंत्राटी पध्दतीवर राहील.

10) कंत्राट पद्धतीने काम करणाऱ्या क्ष-किरण सहाय्यकाचे काम काराराच्या कालावधीत असमाधानकारक असेल तर अशा क्ष-किरण सहाय्यक कंत्राट पद्धतीवरील नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी दिनांक 08.04.2021 रोजी सायंकाळी 4=00 वाजेपर्यंत वैद्यकीय अधिक्षक कस्तुरबा रुग्णालय यांचे कार्यालयात अर्ज सादर करावेत.

दिनांक 08.04.2021 नंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

सही/-
वैद्यकीय अधिक्षक
कस्तुरबा रुग्णालय